# संत सोहिरोबानाथांचे विचार आजही उपयुक्त

## वसंत कोळंबकर यांचे प्रतिपादन : आंबिये महाविद्यालयात संत सोहिरोबानाथांची जयंती उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २५ : संत सोहिरोबांचा संपूर्ण जीवनपट आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या साहित्यकृतींतील ज्ञान आजच्या आधुनिक युगातही उपयुक्त आहे, असे प्रतिपादन संत सोहिरोबानाथांच्या साहित्याचे अभ्यासक, सुप्रसिद्ध व्याख्याते वसंत कोळंबकर यांनी केले.



विर्नोडा : सुप्रसिद्ध व्याख्याते वसंत कोळंबकर यांच्यासोबत महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग.

आंबिये महाविद्यालयातील मराठी विभाग आणि महाविद्यालयाचे भाषा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या गोमंतकातील संत कवी, संत सोहिरोबानाथ आंबिये यांच्या जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. आधुनिक समाजात संत सोहिरोबानाथ आंबिये यांच्या शिकवणीची प्रासंगिकता' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रविणा केरकर, मराठी विभाग प्रमुख विष्णू वेटे, वाणिज्य विभाग प्रमुख विरेंद्र आमोणकर, भाषा केंद्राचे समन्वयक आनंद कोळंबकर, इतर प्राध्यापक वर्ग व विद्यार्थीवर्ग उपस्थित होते.

कार्यशाळेची सुरुवात संत सोहिरोबानाथांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.कार्यशाळेचे प्रास्ताविक व स्वागत भाषा केंद्राचे समन्वयक आनंद कोळंबकर यांनी केले. पाहुण्यांची ओळख तृतीयवर्ष , मराठी विभागाची विद्यार्थिनी अनिशा कुबल हीने करून दिली.

संत सोहिरोबानाथांसारख्या थोर व्यक्तींचा आपण आदर्श घेऊन त्यांनी दाखविलेल्या मार्गाचा अवलंब करत एक उत्तम नागरिक झाले पाहिजे, असे प्राचार्या डॉ प्रवीणा केरकर यांनी सांगितले.

सूत्रसंचालन तृतीयवर्ष, मराठी विभागाचा विद्यार्थी भिसे गवस यांने केले. द्वितीयवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी हर्षा कांबळे यांनी आभार मानले.

**TRANSFER OF VEHICLE**

Notice is hereby given that my **Father Late Jamil Ahamad Dafedar** expired, is the owner of **Honda City 1.5 VMT Tourist Taxi** bearing **Reg. No. GA-06-T-6282,** having **Permit No. STA/AGTTP/ 202000015.** The above vehicles/ permit is now being transferred in my name **Mr. Riyaz Ahmed Dafedar,** Son of Late Jamil Ahamad Dafedar, H. No. 2/27 A, Near Sea Shore Lotus Holy Cross, Vaddem Vasco, Dabolim, Mormugao, South Goa 403802.

If any one has any objection kindly contact Director of Transport, Panaji-Goa & Asst. Director of Transport, Vasco Goa **within 15 days** from the publication of this notice.

Date: 25.02.2025 Sd/- **Mr. Riyaz Ahmed Dafedar**

Sandeep Ads

Village Panchayat Guirdolim Salcete, Goa.
Ref. No. VP/GUIR/2024-25/ 907
Date: 24.02.2025

**TENDER NOTICE**
**(e-TENDERING MODE ONLY)**

Tender Notice No. VP/GUIR/2024-25/ 907 in that 907/1 to 907/10 dated 24.02.2025 has been issued and the same is displayed on the website **https://eprocure.goa.gov.in**

For participation of the interested contractors in this e-tender, please visit the above mentioned website or contact this office for more details.

Seal
Sd/- (Smt. Sonia Fernandes)
Sarpanch, V. P. Guirdolim

**CHANGE IN NAME**

I, **RAJASHRI ANOOP PHATARPEKAR,** r/o H. No. 28, GOKULWADI, SANQUELIM, NORTH GOA, GOA - 403507, Hereby change my name from **RAJASHREE CHIMMO SHETYE** to **RAJASHRI ANOOP PHATARPEKAR.** Hereinafter in all my dealings and documents, I will be known as **RAJASHRI ANOOP PHATARPEKAR.**

# मये मतदारसंघात सव्वा कोटीची नवी जलवाहिनी

आमदार प्रेमेंद्र शेट यांनी केला कामाचा शुभारंभ

टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २५ :** मये मतदारसंघात मये, चोडण पंचायतक्षेत्रात पाणी पुरवठा अधिक मुबलक व नियमित करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून सुमारे सव्वा कोटी रुपये खर्चून नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. आमदार प्रेमेंद्र शेट यांनी या कामाचा शुभारंभ शारदा नगर व व चोडण येथे केला.



मये : नवीन जलवाहिनी घालण्याच्या कामाचा शुभारंभ करताना आमदार प्रेमेंद्र शेट. सोबत शंकर चोडणकर, कृष्णा चोडणकर, उमाकांत परब गावकर व इतर मान्यवर.

जिल्हा अध्यक्ष शंकर चोडण कर, सरपंच कृष्णा चोडणकर, सीमा आरोंदेकर, अभियंता काकोडकर, उपसरपंच उमाकांत परब गावकर तसेच चोडण येथील सरपंच पंचायत सदस्य व पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

शारदानगर येथे सुमारे दीड किलोमीटरचे नवीन पाईप लाईन तर चोडण येथे साडेचार किलोमीटरची पाईपलाईन ९० क्षमतेची असून पूर्वी असलेले ६३ची बदलून ज्यादा क्षमतेची घालण्यात आल्याने पाण्याचा प्रवाह चांगल्याप्रकारे मिळणार असून नियमित व मुबलक पाणीपुरवठा देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे आमदार प्रेमेंद्र शेट यांनी सांगितले.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी यासाठी विशेष सहकार्य दिल्याबद्दल शेट यांनी अभिनंदनही केले

प्रत्येक गावात मुबलक पाणीपुरवठा होण्यासाठी गावातील पाणी गावासाठी वापरणे हा आमचा संकल्प असून त्या दृष्टीने आम्ही चाचप णी सुरू केलेली आहे. गावातील नैसर्गिक तलाव झरे व इतर ठिकाणी असलेले पाणी साठवून गावागावात टाक्या उभारून त्या ठिकाणी गावात पुरवण्याची योजना विचारधीन आहे, असे आमदार प्रेमेंद्र शेट यांनी सांगितले. यावेळी शंकर चोडणकर, कृष्णा चोडणकर तसेच पंचायतीचे सरपंच पंचायत सदस्यांनी नव्या कामाच्या शुभारंभप्रसंगी मुख्यमंत्री तसेच आमदारांचे अभिनंदन केले.



# संस्कृतीचे जतन करणाऱ्या संस्थेला सदोदित सहकार्य

टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २५ : गावातील संस्था आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे कार्यक्रमाचे आयोजन करत असतात. अशा संस्थेना प्रत्येक गावातील पंचायत मंडळ आश्रयदात्यांनी हातभार लावून सहकार्य करावे, असे आवाहन मांद्रेचे माजी सरपंच तथा विद्यमान पंच प्रशांत नाईक यांनी केले. मोरजी पंचायतन कला संस्थेने पेडणे तालुका मर्यादित वाळू पासून किल्ले तयार करण्याची स्पर्धा तेमवाडा मोरजी समुद्रकिनारी भागात आयोजित केली होती. त्यावेळी प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते.

यावेळी मोरजीचे सरपंच पवन मोर्जे, उपसरपंच सुप्रिया पोके, पंच तथा माजी सरपंच मुकेश गडेकर, कुणाल ठाकूर, विद्या प्रसारक हायस्कूलचे मुख्याध्यापक दिलीप मेथर,

गौरेश आरोलकर – अध्यक्ष, साईदास नाईक – परीक्षक, उमाकांत पोके – परीक्षक, चंद्रसेन पोके, संगम मोर्जे, अरुण गवंडी आदी उपस्थित होते.सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपट्याला पाण्याचं सिंचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

माजी पंच प्रशांत नाईक यांनी सांगितले की, या स्पर्धेमधून वेगवेगळ्या कलाकारांना एक व्यासपीठ उपलब्ध होत असते. शिवाय आपल्या राज्यात, देशात ज्या –ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांनी तयार केलेली किल्ले आहेत, त्यांचे दर्शन एकाच ठिकाणी होण्यासाठी एक चांगला पायंडा एक चांगली स्पर्धा आयोजकांनी आयोजित केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

मोरजीचे सरपंच पवन मोर्जे यांनी सांगितले की, विद्यार्थी मुले अनेकवेळा समुद्रकिनारी आपल्या आई–वडिलांबरोबर कुटुंबीयांसोबत येत असतात. परंतु, मातीत कधी हात घालत असल्याचे चित्र थोड्या प्रमाणात दिसत असले तरी मोरजी पंचायतन कला संस्थेने विद्यार्थ्यांसाठी वाळूपासून किल्ले तयार करण्याची स्पर्धा आयोजित करून या मुलांना पारंपरिक कला आणि वाळूमध्ये हात घातल्यानंतर ते किल्ले कशा प्रकारचे तयार करतात, ते किल्ले तयार करताना अगोदर कोण कोणते साहित्य वापरावे लागते? याची माहिती या स्पर्धेमधून विद्यार्थ्यांना झाली असल्याचे ते म्हणाले.

विद्या प्रसारक हायस्कूलचे मुख्याध्यापक दिलीप मेथर म्हणाले की, मोरजी पंचायतन कला संस्थेने मागच्या आठ वर्षापासून वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित करून कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच पारंपरिक कला आणि संस्कृती टिकवण्याचे कार्य केले जात आहे. मोरजी पंचायतन कला संस्थेने अनेक स्पर्धांमध्ये सहभाग दर्शवून कारनिव्हल सिग्मोत्सव यामध्ये चित्ररथ तयार करून विजेते पदही पटकावले त्याबद्दल त्यांनी आगामी काळातही या संस्थेला शुभेच्छा दिल्या.




# साखळी सरकारी महाविद्यालयात जागवला छत्रपती शिवरायांचा इतिहास

टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. २५ :** कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी येथील इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवरायांच्या किल्ल्यांच्या प्रतिकृतीचे एक अनोखे प्रदर्शन साकारून छत्रपती शिवरायांचा इतिहास जागवण्याचे काम केले. बी.ए.भाग दोनमधील विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेत छत्रपती शिवरायांचा काळ किल्ल्यांच्या माध्यमातून उभा केला. विद्यार्थ्यांच्या अथक प्रयत्नातून रायगड, सिंहगड, विजयदुर्ग, तोरणा, प्रतापगड, पन्हाळा, जंजिरा, सिंधुदुर्ग या किल्ल्यांच्या प्रतिकृती उभारण्यात आल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी इतिहास विभागातील विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना संबोधित करताना विविध किल्ल्यांची माहिती त्यांनी दिली. यावेळी बी.ए.भाग दोनची विद्यार्थिनी सानिका घडशी यांचे मनोगत झाले. बी.ए.भाग दोनचा विद्यार्थी फैजान यांनी आभार मानले.

Village Panchayat Penha de Franca, Britona Bardez Goa
Ref. No. VP/PDF/006/24-25/2221 **QUOTATION NOTICE** Dated : 20/02/2025

I the Sarpanch of Village PanchayatPenha de Franca on behalf of Village Panchayat invites sealed quotation from the registered Agency/Labour Supply Contractor/Dealer to supply Labour skilled/unskilled and multi-tasking to the Village Panchayat of Penha de Franca for the Door to door Garbage collection, cleaning of garbage black spots, swiping of roads/Public places other labour related works and administrative work of the office. The sealed quotations shall reach this Office on or before **12/03/2025 at 11.00 a.m.** and will be opened on **15/03/2025 at 11.30 a.m.** at Village Panchayat Office.

| Sr. No. | Particulars | Price |
|---|---|---|
| 1. | Labour Skilled | |
| 2. | Labour Unskilled | |
| 3. | Multitasking staff | |

Terms & Conditions: **1.** The Dealer should be registered Authorized Suppliers/Dealers Agencies. **2.** That the said items shall be delivered within 5 days from the date of Supply Order failure to which Order will be cancelled and will be validity considered for 2nd Lowest Supplier or the Supplier who fulfills the Supply Order within Stipulated period. **3.** The Dealer should have Sales Tax/TIN/CGST/SGST Registration Certificate. **4.** The Quotation or Application will be rejected on no compliance of above referred Conditions. **5.** The Panchayat reserve the right to accept or reject one or all Quotations without assigning any reason thereof.

Seal Sd/-
( Sapnil R. Chodankar ) Sarpanch, V.P. Penha de Franca

Village Panchayat Penha de Franca, Britona Bardez Goa
Ref. No. VP/PDF/006/24-25/2223 **QUOTATION NOTICE** Dated : 20/02/2025

I the Sarpanch of Village PanchayatPenha de Franca on behalf of Village Panchayatinvites sealed quotation from the registered Agency/Labour Supply Contractor/Dealer to supply Labour skilled/unskilled and Daily Wages to the Village Panchayat of Penha de Franca for the roadside bush cutting/dangerous trees/trimming of branches of trees in V.P. Jurisdiction. The sealed quotations shall reach this Office on or before **12/03/2025 at 11.00 a.m.** and will be opened on **15/03/2025 at 11.30 a.m.** at Village Panchayat Office.

| Sr. No. | Particulars | Price |
|---|---|---|
| 1. | Labour Skilled | |
| 2. | Labour Unskilled | |
| 3. | Daily Wages | |

**Terms & Conditions: 1.** The Dealer should be registered Authorized Suppliers/Dealers Agencies. **2.** That the said items shall be delivered within 5 days from the date of Supply Order failure to which Order will be cancelled and will be validity considered for 2nd Lowest Supplier or the Supplier who fulfills the Supply Order within Stipulated period. **3.** The Dealer should have Sales Tax/TIN/CGST/SGST Registration Certificate. **4.** The Quotation or Application will be rejected on no compliance of above referred Conditions. **5.** The Panchayat reserve the right to accept or reject one or all Quotations without assigning any reason thereof.

Seal Sd/-
( Sapnil R. Chodankar ) Sarpanch, V.P. Penha de Franca

Village Panchayat Penha de Franca, Britona Bardez Goa
Ref. No. VP/PDF/006/24-25/ 2224 **QUOTATION NOTICE** Dated : 20/02/2025

I the Sarpanch of Village Panchayat Penha de Franca on behalf of Village Panchayat invites sealed quotation from the registered Agency/Labour Supply Contractor/Dealer to supply Labour skilled/unskilled and Daily Wages to the Village Panchayat of Penha de Franca for the Desilting of drains/Gutters/Wells and Clearing of mud on roads/public places and other emergency works in V.P. Jurisdiction. The sealed quotations shall reach this Office on or before **12/03/2025 at 11.00 a.m.** and will be opened on **15/03/2025 at 11.30 a.m.** at Village Panchayat Office.

| Sr. No. | Particulars | Price |
|---|---|---|
| 1. | Labour Skilled | |
| 2. | Labour Unskilled | |
| 3. | Daily Wages | |

**Terms & Conditions: 1.** The Dealer should be registered Authorized Suppliers/Dealers Agencies. **2.** That the said items shall be delivered within 5 days from the date of Supply Order failure to which Order will be cancelled and will be validity considered for 2nd Lowest Supplier or the Supplier who fulfills the Supply Order within Stipulated period. **3.** The Dealer should have Sales Tax/TIN/CGST/SGST Registration Certificate. **4.** The Quotation or Application will be rejected on no compliance of above referred Conditions. **5.** The Panchayat reserve the right to accept or reject one or all Quotations without assigning any reason thereof.

Seal Sd/-
( Sapnil R. Chodankar ) Sarpanch, V.P. Penha de Franca

# डिचोलीत चोरी; १ लाखाचे सामान लंपास

टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २५ : भायली पेठ डिचोली येथील नारायण चणेकर यांच्या घरातील विविध वस्तू अज्ञात चोरट्यानी पळवल्याची तक्रार डिचोली पोलिसात दाखल केली आहे. सदर बंद घरात प्रवेश करून तांब्याचा ढोल तसेच लाखभर रुपयांचे सामान चोरट्यांनी नेल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# बांदा विठ्ठल मंदिरात दासनवमी सोहळा

टीम दैनिक हेराल्ड

बांदा, दि. २५ : येथिल श्री विठ्ठल मंदिरामध्ये अनेक वर्षांच्या परंपरेप्रमाणे श्री रामदास नवमीचा सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. त्यानिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सकाळी मंदिरात श्री विठ्ठल रखुमाईची नित्यपुजा होऊन श्री रामदास स्वामींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दुपारी राम नामाचे सामूहिक नामस्मरण करण्यात आले. त्यानंतर नैवेद्य अर्पण करून महाआरती झाली व महाप्रसादास आरंभ झाला . ७ वाजता मंदिरात नित्य सायं आरती झाली. त्यानंतर स्थानिक भजन सेवेकऱ्यांची भजनसेवा झाली. या सोहळ्यानिमित्त भाविकांनी दर्शन घेतले..

**IN THE COURT OF THE MAMLATDAR OF BARDEZ TALUKA AT MAPUSA, GOA**

**Case No: MAM / MND / PUR / VERLA / 07 / 2024**

1. Mr. Ravi Krishna Arlekar alias Ravi Crisna Ragji Arlekar, son of late Krishna V. Arlekar alias Crisna Ragji Arlekar, aged 53 years, married, agriculturist, R/o H. No. 78/127 (old) 78/A (new), Freitas Vaddo, Verla, Post Parra, Bardez, Goa .....Applicant

V/s

1. Pedru Sebastiao Dais, R/o Paitona, Salvador do Mundo, Bardez, Goa ....Opponent

**PUBLICATION NOTICE**

To The Applicant / Opponent

WHEREAS the above named applicant, have made an application dated 26/4/2024 u/s 16(1) of Goa Daman and Diu Mundkars (Protection from Eviction) Act,1975, for Mundkar Purchase in this court against you in respect of dwelling house bearing No. H.No. 78/127 (old) 78/A (new) situated in the properties bearing Sy. No. 64/4 of village Verla, Bardez, Goa.

And Whereas the applicant by application dated 16/12/2024 informed that the notices issued returned unserved with the postal remark "Not Known " and that the applicant is not aware of any other addresses of the said opponents and it is therefore prayed for substitute service to the said opponent and their heirs by way of publication in daily newspaper.

And Whereas this Court is satisfied that this is a fit case for ordering such service.

Now therefore, notice is hereby given to you under Order V of Rule 20(1)A of the C.P.C. 1908 to appear before this Court either in person or by duly authorization on **26/3/2025 10.30** to answer the claim.

Take notice that in default of your appearance as aforesaid on the date and time mentioned above, the application will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 24th day of February, 2025.

Sd/- **Anant Rajaram Malik** Seal
Mamlatdar of Bardez Taluka, Mapusa, Goa

**BEFORE THE MAMLATDAR/Jt. MAMLATDAR OF PONDA, PONDA, GOA.**
Case Nos. MUT/47344 & 47345/USGAO/2025

Reshma Ashok Patil
r/o Ponda Goa **.....Applicant**

V/S

1. Santosh Yeshwant Naik, Tiral, Usgao Ponda Goa.
2. Yeshwant Amrut Naik, deceased.
**.... Respondents**

To,
The abovenamed respondents/legal heirs,

**PUBLIC NOTICE**

**WHEREAS,** the abovenamed applicant vide application dated **05/12/2024** filed u/s 96 of the Land Revenue Code, 1968 has prayed for mutation in Survey records at Survey holding Nos. & Sub. Div. No. **99/10** and **99/17** of village **Usgao** of Ponda taluka, South District, State of Goa. requesting therein to delete the name of Yeshwant Amrut Naik from Tenant Column under Survey No. 99/10 and 99/17 of village Usgao of Ponda Taluka as she has acquired right by virtue of Court Order decided in the Court of the Mamlatdar of Ponda Taluka. Ponda Goa under Case No. Jm/Tnc/11/2013 dated 26-09-2022 and also produced Will executed before Notary Ex-Officio Ponda drawn at pages 33 to 38 for Wills No.45 dated 03-08-201 1, Will executed before Notary Ex-Officio Ponda drawn at pages 38 to 43 for Wills No.45 dated 03-08-201 I and Deed of Consent executed before Notary Ex-Officio Ponda drawn at pages 97 to 98v for Deeds No.405 dated 03-08-201 1 for a plot admeasuring an area of 2575 sq. mts. & 1000 sq. mts. Respectively.

**AND WHEREAS,** the notices in Form X was served to all the interested parties by registered A. D., however some of the notices could not be served and returned unserved to the sender with postal remark expired.

**AND WHEREAS,** the aforesaid applicants by application dated **20/02/2025** has prayed for substitute service by means of publication in the local daily newspaper under order V rule 20 (1A) of the C. P. C. 1908. As the applicant has submitted that she is not aware about the correct addresses of the respondents/their heirs if any for effecting personal service of the notice and prayed to serve notice by way of publication in the local newspaper. Whereas I am satisfied that this is a fit case for such a publication.

**NOW THEREFORE,** all the interested parties are hereby given notice of the said mutation entry and called upon to file their objection if any to the mutation entry in the office of Mamlatdar/Jt. Mamlatdar of Ponda within fifteen clays from the date of publication of this notice alongwith material/documentary evidence on which you rely upon in person or through authorized agent, failing which deem fit action under relevant provision of the Goa, Daman & Diu Land Revenue Code, 1968 will be taken in your absence.

Given under my hand & seal on this **25th day of February 2025.**

SEAL **Sd/- Rosario Carvalho**
**Jt. Mamlatdar-II of Ponda**
**Ponda, Goa.**

# क्रीडा दिनामुळे खेळांविषयीची भावना वाढीस

टीम दैनिक हेराल्ड

प्राचार्य नामदेव गावस : साखळी सरकारी महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा दिन उत्साहात

**पर्वरी, दि. २५ :** क्रीडा दिनामुळे खेळांविषयीची भावना वाढीस लागते. तसेच खेळांमुळे आरोग्यही तंदुरूस्त राहते, असे कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी सांगितले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभाग व विद्यांर्थी परिषदेच्या सहकार्याने वार्षिक क्रीडा दिन उत्साहात पार पडला. हा वार्षिक क्रीडा दिन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राचार्य गावस बोलत होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विद्याप्रबोधिनी वाणिज्य, शिक्षण, संगणक आणि व्यवस्थापन महाविद्यालय पर्वरीचे क्रीडा संचालक डॉ. सनी काणेकर, सन्माननीय पाहुणे म्हणून उच्च शिक्षण संचालनालयाचे सहायक संचालक सिद्धेश केसरकर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागाचे संचालक साईश गोलतकर आदी मान्यवर उपस्थित होते. वार्षिक क्रीडा दिन कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ. गावस यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देत उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर महाविद्यालयाचा ध्वज फडकविण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांच्यावतीने ग्रॅण्ड मार्च काढण्यात आला. तसेच यावेळी प्रेरणादायी मशाल रिलेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. सनी रामदास काणेकर आणि सहायक संचालक सिद्धेश केसरकर यांचे विद्यार्थ्यांना संबोधून प्रेरणादायी मनोगत झाले. या मनोगतानंतर प्रमुख पाहुण्यांच्या परवानगीने विविध स्पर्धांना सुरुवात झाली.

उद्घाटनानंतर विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. विद्यार्थ्यांसाठी १०० मीटर, २००मीटर, ४००मीटर आणि ८००मीटर धावण्याच्या शर्यतीचे आयोजन करण्यात आलेले होते. याशिवाय ४ गुणिले १०० मीटर रिले (पुरुष आणि महिला) ४ गुणिले ४०० मीटर रिले (पुरुष) आणि मिश्र रिले या स्पर्धांचा समावेश होता. तर प्राध्यापकांसाठी कंट्रोल क्रिकेट आणि थ्रोबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. वार्षिक क्रीडादिन २०२४–२०२५ यामध्ये विद्यार्थ्यांबरोबर प्राध्यापकांचा उत्साहही कमालीचा होता. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत प्राध्यापकांनीही स्वत:मधल्या क्रीडागुणांचे दर्शन घडविले. प्रमुख पाहुणे व मान्यवर यांच्याहस्ते विजेत्या खेळाडूंना बक्षीस वितरण करण्यात आले. त्यानंतर क्रीडा प्रशिक्षक डोराथी आल्फान्सो यांनी आभार मानले.

# शिक्षणासाठी शिस्त व जिज्ञासा आवश्यक

## उद्योजक गुरुदास नाटेकर : दत्ताराम मंत्रवादी मेमोरियल हायस्कूलच्या नवीन विज्ञान प्रयोगशाळा कक्षाचे उद्घाटन

टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २५ :** शिक्षणासाठी शिस्त व जिज्ञासा अत्यंत आवश्यक असते. पालक व शिक्षक यांच्या सहकार्यानेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असतो, असे उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. गुरुदास नाटेकर यांनी सांगितले. म्हापसा येथील दत्ताराम मंत्रवादी मेमोरियल हायस्कूलच्या नवीन विज्ञान प्रयोगशाळा कक्षाचे व विज्ञान प्रकल्प स्पर्धेचे उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते.



म्हापसा : दत्ताराम मंत्रवादी मेमोरियल हायस्कूलच्या नवीन विज्ञान प्रयोगशाळा कक्षाचे उद्घाटन करताना उद्योजक डॉ. गुरुदास नाटेकर. बाजूला संस्थेचे अध्यक्ष मंगेश मंत्रवादी व इतर मान्यवर.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मंगेश मंत्रवादी, विश्वस्त सदस्य मिना मंत्रवादी, पालक–शिक्षक संघाच्या सौ. कोरगावकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका गीता नेवगी, मुख्याध्यापक शिवाजी मळीक, परीक्षक तथा माजी मुख्याध्यापक रत्नकांत शिरोडकर, परीक्षक तथा शिक्षक मेहुल तुपकर यांची उपस्थिती होती.

हायस्कूलला सर्व प्रकारच्या अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज अशी विज्ञान प्रयोगशाळा पुरस्कृत केल्याबद्दल उद्योजक गुरुदास नाटेकर यांच्याप्रति संस्थेचे अध्यक्ष मंगेश मंत्रवादी यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी घेण्यात आलेल्या विज्ञान प्रकल्प प्रदर्शन स्पर्धेत स्माही कोरगावकर, विरा नाईक (प्रथम) रितम बंक, आदर्श प्रजापती (द्वितीय ) कृत्तिका कवठणकर, राबिका मोंडल (तृतीय) ( इयत्ता तिसरी – चौथी) अयान शेख, साकिब सय्यद (प्रथम) फिजा खान, काव्या देसाई (द्वितीय ) नूमन शेख, आदिल खान (तृतीय) (इयत्ता पाचवी ते सातवी) अल्खमर आलम, पवन सिंग (प्रथम) अरमान खान, योगिंद्रसिंग राजपूत (द्वितीय ) लकी स्वामी, अन्नु स्वामी (तृतीय) (आठवी–नववी) या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्राप्त झाली. परीक्षक रत्नकांत च्यातिम (शिरोडकर) व मेहुल तूपकर यांनी स्पर्धक विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सहभागाबद्दल समाधान व्यक्त केले. विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांनाही मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक मुकुंद माळगावकर यांनी केले. शिक्षिका शुभांगी शिंदे यांनी आभार प्रदर्शन केले.

यूनियन बैंक ऑफ इंडिया भारत सरकार का उपक्रम | Union Bank of India A Government of India Undertaking

क्षेत्रीय कार्यालय, 2 रा मजला, एलआयसी बिल्डींग, ईडीसी कॉम्प्लेक्स, पाटो, पणजी, गोवा
दूर.क्र. : 0832-2437971/72/73/74 (विस्तार–23)

**वाहनांच्या विक्रीसाठी निविदा सूचना**

युनियन बँक ऑफ इंडियाच्या ताब्यात असलेल्या वाहनांच्या ई–लिलावाद्वारे विक्रीसाठी अर्ज मागवले आहेत. वाहनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| शाखेचे नाव व संपर्क क्र. | वाहनाचा तपशील | नोंदणी प्रकार | नोंदणी क्र. | नोंदणीची तारीख | राखीव किंमत (रु.) | ईएमडी (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| बाणावली 0832-2770644 | मारूती सुझुकी स्वीफ्ट व्हीएक्सआय– पेट्रोल | खाजगी | जीए–08–एए–290१ | 04.08.2022 | 5,37,500.00 | 53,750.00 |

**विक्रीच्या अटी व शर्ती :**

**(1)** सदर लिलाव **04.03.2025** रोजी **सकाळी 11.00** वा. **जसे आहे जेथे आहे व जे आहे जे काही** आहे या तत्वावर घेतला जाईल. इच्छुक खरेदीदार–बोलीदारांनी **03.03.2025** रोजी संध्या. **5.00** वा त्यापूर्वी एनईएफटी/आरटीजीएस द्वारे **खाते क्र. 166321980050000** व **आयएफएससी यूबीआयएन 0916633** मध्ये एनईएफटी/आरटीजीएस किंवा डिमांड ड्राफ्ट द्वारे बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) जमा करावी. **(2)** यशस्वी बोलीदार म्हणून जाहीर झालेल्या व्यक्तीने जमा केलेली ईएमडी वजा करून विक्रीची **100%** रक्कम लिलावाच्या सात दिवसांच्या आत म्हणजे **10.03.2025** रोजी वा त्यापूर्वी जमा करावी. **(3)** ई–लिलाव **04.03.2025 रोजी सकाळी 11.00** ते **दुपारी 1.00 या वेळात** (**10** मिनिटांच्या अमर्यादित स्वयंचलित विस्तारासह) **https://www.bankeauctions.com** या पोर्टलद्वारे घेतला जाईल. इच्छुक बोलीदारांनी त्यांची नावे **https://www.bankeauctions.com** या संकेतस्थळावर नोंदवणे व मे. सी–वन इंडिया लि. कडून मोफत युजर आयडी व पासवर्ड घेणे आवश्यक आहे. (संपर्क अधिकारी श्री. भाविक आर. पंड्या मोबा. क्र.**-8866682937**, हेल्प लाईन क्र. **729198112425/26**, ईमेल : **Maharashtra@c1india.com** ). **(4)** त्यासाठी कोणतेही कारण न देता लिलाव रद्द करण्याचा किंवा सर्वोच्च बोली न स्वीकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे. **(5)** त्यापुढील बोली अगोदरच्या बोली पेक्षा किंवा सर्व वाहनांसाठी ठरवलेल्या राखीव किमतीपेक्षा रु. **5,000/-** हून कमी नसावी. **(6)** वाहन विक्री किंमतीची रक्कम भरल्यावर/जमा केल्याची खात्री झाल्यानंतर जसे आहे जेथे आहे या स्थितीत त्या वाहनाची डिलीव्हरी दिली जाईल. **(7)** अयशस्वी बोलीदार ज्यांनी ईएमडी जमा केली आहे ते विक्री संमत झाल्यावर व्याजाशिवाय सदर जमा रक्कम परत मिळण्यास पात्र राहतील. **(8)** तारण ठेवलेल्या वाहनातील कोणत्याही त्रुटीसाठी बँक जबाबदार राहणार नाही वा त्यांचे दायित्व असणार नाही.**(9) देय रस्ता कर/पॅसेंजर कर इ. याची माहिती बोलीदारांनी आरटीओ कडून घ्यावी व लिलावात भाग घेण्यापूर्वी देय पार्किंग चार्जेसचा भरणा करावा. आरटीओ/विमा कंपनी/कोणतेही अन्य प्राधिकरण यांना कोणतेही देय असल्यास त्यांचा खर्च बोलीदारास सोसावा लागेल. (10)** बोली रकमेची उर्वरित रक्कम **10.03.2025** रोजी वा त्यापूर्वी जमा करण्यास यशस्वी बोलीदारास अपयश आल्यास त्याने जमा केलेली ईएमडी बँकेद्वारे जप्त केली जाईल व स्वीकारलेली बोली स्वयंचलितपणे रद्द होईल. **(11)** बोलीदारांस, त्यांची इच्छा असल्यास, ते पूर्ववेळ घेऊन आठवड्यातील कामाच्या दिवशी विकावयाच्या जंगम मालमत्तांची पाहणी करू शकतील.

**दिनांक : 25-02-2025**
**ठिकाण : पणजी, गोवा**

सही/–
प्राधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया